**CNR No. MHRG040042412023**

## <u>दिवाणी चौकशी अर्ज क्र. ११६८/२०२३ मधील निशाणी २१ वरील आदेश</u>

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र. १ यांचे नाव कमी करण्याकरिता व मुळ अर्जात दुरूस्ती करण्याची परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे वि.अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, अर्जदारांची आई अर्जदार क्र. १ सुनिता शाम जळे या दि. २७/०२/२०२५ रोजी मयत असुन त्यांना अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाही व त्यांचे नाव मुळ अर्जातून कमी करण्याची व मुळ अर्जात दुरूस्ती करण्याची परवानगी मिळावी.

३. अभिलेखाचे अवलोकन करता व अर्जदार यांचे वि.अधिवक्ता यांचे प्रतिपादन विचारात घेता असे दिसून येते की, सदरहू अर्ज वारस दाखला मिळणेकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ सुनिता शाम जळे यांचे मृत्युप्रमाणपत्र निशाणी क्र. २४ अन्वये अभिलेखावर दाखल असून त्यांचा मृत्यु दि. २७/०२/२०२५ रोजी नमुद असल्याचे दिसुन येते. प्रस्तावित दुरूस्ती केल्यास मुळ अर्जाच्या स्वरूपात कुठलाही बदल होत नाही. सदरहू अर्ज गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी व न्यायाच्या हिताच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. म्हणून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2025.06.18 17:47:35 +0530

(ए.एस. बडगुजर)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
पनवेल

पनवेल
दिनांक १७/०६/२०२५